**दिनांक : ०२/०५/२४**

**विषय : सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पात डुप्लेक्स इमारतींच्या डिझाईन्स चे प्राथमिक सादरीकरण.**

दिनांक ३०/४/२४ रोजी आपल्या सोसायटी च्या पुनर्निर्माण प्रकल्पा अंतर्गत डुप्लेक्स प्रकार च्या इमारतींचे प्राथमिक सादरीकरण तिथले सभासद, त्यांचे कुटुंबीय आणि पंच समिती सदस्यां समोर आपल्या बिल्डर चे आर्किटेक्ट श्री प्रमोद दुबे यांनी केले. आपल्या बिल्डर चे पार्टनर श्री संदीप माहेश्वरी आणि आपले सल्लागार श्री हर्षल कवडिकर ही ह्या प्रसंगी उपस्थित होते.

आरंभी सर्व उपस्थितांचे स्वागत करून पंच समिती सदस्य श्री प्रदीप नेवाळकर यांनी स्पष्ट केले की मागे बिल्डर सोबत डुप्लेक्स धारकांच्या मीटिंग मधे सभासदांतर्फे जे विचार मांडले गेले होते त्याचाच अनुषंगाने श्री दुबे यांनी प्राथमिक डिझाईन तयार केले आहे. आज च्या मीटिंग नंतर सभासद जे विचार मांडतील / सुधार सुचवतील त्या प्रमाणे उपलब्ध जागेत आणि नियमांना धरून जे जे करणे शक्य असेल तसे सुधार आर्क्टिटेक्ट करतील आणि परत एकदा डिझाईन चे सादरीकरण करण्यात येईल.

ह्या नंतर श्री दुबे यांनी त्यांचे PPT सादरीकरण केले. ह्यात मुख्य करून डुप्लेक्स इमारतींची नवीन प्रकल्पात लोकेशन, १ + २ मजले न  करता १ + १ मजले असलेले डिझाईन ज्यात ग्राउंड फ्लोर वर पण एक बेड रूम असेल, सभासदांना दाखविले. त्यांच्या डिझाईन वर सभासदांनी बरेच खुलासे / प्रश्न विचारले आणि श्री दुबे आणि श्री कवडिकर यांनी त्याची समर्पक उत्तरं दिली.

सभासदांच्या आग्रहा वर असे ठरले की श्री दुबे सध्याच्या डिझाईन चा एक सेट सर्व १२ डुप्लेक्स धारकांना त्यांच्या अभ्यासा साठी देतील आणि नंतर डुप्लेक्स सभासद त्यांच्या सूचना लेखी स्वरुपात पंच समिती च्या माध्यमाने श्री दुबे यांना देऊ शकतील. त्या सूचनांचा अभ्यास करून श्री दुबे सूधारित डिझाईन्स चे पुढील सादरीकरण करतील.

आभार प्रदर्शन करण्या आधी श्री नेवाळकर यांनी ह्या गोष्टी चा परत खुलासा केला की बिल्डर सोबत झालेल्या पहिल्या मीटिंग मधे डुप्लेक्स सभासद सोडून इतर कोणी ही उपस्थित नसल्याने पंच समिती ला त्या मीटिंग मधे काय घडलंय ते माहित नसल्याने बिल्डर किंव्हा आर्किटेक्ट यांना डुप्लेक्स इमारती च्या डिझाईन

संबंधात कुठला ही फीड बॅक देण्यात आला नव्हता. त्यामुळे असे म्हणणे की "डुप्लेक्स सभासदांना काही सांगण्यातच आले नाही" हा आरोप बरोबर नाही. शेवटी श्री नेवाळकर यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सादरीकरण संपल्याचे जाहीर केले.

**प्रदीप नेवाळकर**
**पंच समिती साठी**